महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३२९ वा दिनांक : १२/११/२०२५ वार : बुधवार

## शरद पवारांना मोठा धक्का! जिवलग सहकारी अरुण गुजराती अजित पवारांच्या राष्ट्रवादीत



**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अनेक राजकीय घडामोडी घडताना दिसत आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे जिवलग सहकारी, माजी विधानसभा अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते अरुण गुजराती यांनी शरद पवारांची साथ सोडत अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयात अरुण गुजराती हे अधिकृतपणे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत.

आज सकाळीच मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे अरुण गुजराती यांनी शरद पवारांची भेट घेतली. यावेळी ते म्हणाले, शरद पवार साहेबांसोबत आनंदाचा काळ गेला. ज्यांनी मला मोठे केले ते शरद पवार आणि ज्यांनी मला पुढे आणले ते माझे कार्यकर्ते. दोघांच्यामध्ये मी सँडविच झालो होतो. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला, अशी भावनिक प्रतिक्रिया गुजराती यांनी यावेळी दिली.

जेव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विभाजन झाले तेव्हा चोपडा मतदारसंघात अरुण गुजराती यांच्या कार्यकर्त्यांमध्ये देखील मोठी फूट पडली. काही कार्यकर्ते भाजपमध्ये तर काही कार्यकर्त्यांनी इतर पक्षात जाणे पसंत केले. अजित पवारांसोबत गेलात तर आम्ही तुमच्यासोबत राहू नाहीतर आम्हाला आमचा मार्ग मोकळा आहे, असे कार्यकर्त्यांनी सांगितल्यानंतर अरुण गुजराती यांना अखेर अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. अरुण गुजराती यांच्या निर्णयामुळे मात्र अजित पवारांना चोपडा मतदारसंघात मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. तसेच अरुण गुजराती यांचा पक्ष प्रवेश हा प्रतिष्ठेचा प्रवेश मानला जात आहे.

अरुण गुजराती हे शरद पवारांचे ४० वर्षांपासूनचे निष्ठावंत शिलेदार मानले जातात. त्यांनी कॉंग्रेस पक्षातून शरद पवार यांच्यासोबतच राजकारणाची सुरुवात केली होती. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केल्यापासून अरुण गुजराती शरद पवारांसोबतच होते. अरुण गुजराती यांनी मंत्री, विधानसभेचे अध्यक्ष, प्रदेशाध्यक्ष, अशा विविध पदांवर काम केले आहे. तसेच चोपडा मतदारसंघात गुजराती यांनी आमदार म्हणून दोन कार्यकाल पूर्ण केले होते.

## छत्रपती संभाजीनगर मनपा निवडणूक २०२५ आरक्षण जाहीर : महिलांसाठी मोठी संधी




**छत्रपती संभाजीनगर :** आगामी महानगरपालिका निवडणूक २०२५ साठी बहुचर्चित छत्रपती संभाजीनगरमधील आरक्षण तक्ता अखेर जाहीर झाला आहे. एकूण ११५ प्रभागांसाठीचा आरक्षण तक्ता निश्चित करण्यात आला असून, ५७ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या घोषणेनंतर स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना आणि रणनीतींना वेग आला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने तयार केलेल्या तक्त्यानुसार, सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांमध्ये आरक्षणाचे संतुलन ठेवण्यात आले आहे. यंदाच्या निवडणुकीत महिलांना मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळणार असून, सुमारे अर्ध्या जागा महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत.

आरक्षण तक्त्यानुसार, एकूण ११५ प्रभागांपैकी ३१ जागा सर्वसाधारण पुरुषांसाठी, ३० सर्वसाधारण महिलांसाठी, ११ अनुसूचित जाती पुरुष, ११ अनुसूचित जाती महिला, १ अनुसूचित जमाती पुरुष, १अनुसूचित जमाती महिला, १५ ओबीसी पुरुष आणि १५ ओबीसी महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. महिला आरक्षणाची ही टक्केवारी मागील निवडणुकीपेक्षा वाढलेली असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या नव्या तक्त्यामुळे शहरातील प्रमुख पक्षांसमोर उमेदवार निवडीत नवे आव्हान उभे राहिले आहे. शिवसेना शिंदे गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट, कॉंग्रेस आणि मनसे, या सर्व पक्षांना आरक्षणाच्या नव्या गणितानुसार उमेदवारांची पुनर्रचना करावी लागणार आहे. गेल्या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये पुरुष नेत्यांनी सलग विजय मिळवले होते, मात्र आता त्या जागा महिलांसाठी राखीव झाल्याने जुनी समीकरणे बदलणार आहेत. काही ठिकाणी प्रस्थापित नेत्यांना आपल्या पत्नी, भगिनी किंवा कार्यकर्त्यांना पुढे करावे लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

आरक्षणामुळे यंदाच्या निवडणुकीत महिला उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर संधी मिळणार आहे. सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या महिला कार्यकर्त्या, महिला संघटनांच्या नेत्यांना आणि पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना आता स्थानिक स्वराज्यात आपली छाप पाडण्याची संधी मिळेल. राजकीय विश्लेषकांच्या मते, या तक्त्यामुळे शहरात महिलांचे नेतृत्व उदयास येईल आणि निर्णयप्रक्रियेत स्त्रीदृष्टिकोन वाढेल.

प्रशासनाकडून आरक्षण तक्ता जाहीर झाल्यानंतर आता निवडणुकीच्या कार्यक्रमाची अधिकृत घोषणा राज्य निवडणूक आयोग करणार आहे. त्यानंतर नामनिर्देशन, छाननी, माघार आणि मतदानाच्या तारखा निश्चित केल्या जातील. तक्ता प्रसिद्ध होताच सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या प्रभागात हालचाली सुरू केल्या आहेत. काही प्रभागांमध्ये आरक्षण बदलल्याने असंतोषाचे सूर उमटत आहेत, तर काहींनी याकडे नव्या संधीच्या रूपात पाहिले आहे.

## एकनाथ शिंदेंचा सुनील राऊतांना फोन : संजय राऊतांच्या प्रकृतीची केली विचारपूस, म्हणाले - लवकर बरे व्हा



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार सुरू होते. सोमवारी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांना फोन करून संजय राऊत यांच्या तब्येतीची विचारपूस केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच 'लवकर बरे व्हा' असे म्हणत आपुलकीचा संवाद साधल्याचे समजते.

एकनाथ शिंदे यांनी आमदार सुनील राऊत यांना फोन करत संजय राऊत यांची विचारपूस केली. यावेळी बोलताना त्यांनी विचारले की, घरी आणले आहे का? इन्फेक्शन होऊ शकते, काळजी घ्या. तसेच त्यांना सांगा लवकर बरे व्हा, असा संवाद शिंदे यांनी सुनील राऊत यांच्याशी फोनवरून साधला आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे गुलाबराव पाटील यांनी देखील एका जाहीर सभेत बोलताना संजय राऊत यांच्या तब्येतीची काळजी बोलून दाखवली होती.

गुलाबराव पाटील यांनी एका जाहीर सभेत बोलताना संजय राऊत यांच्याविषयी बोलताना म्हटले होते की, बघा ना माझा संजय राऊत कसा अॅडमिट आहे. काय सांगावे तुम्हाला, वो मेरा माल हें भाई, माल हें. ते वाचले पाहिजे. मी देवाला प्रार्थना केली की त्याला सद्बुद्धी दे. सत्यानाश करणाऱ्या लोकांना देवाने चांगली बुद्धी दिली तर उद्धव ठाकरेंसोबत जे २० लोक आहेत ते टिकून राहतील, असे गुलाबराव पाटलांनी म्हटले होते.

दरम्यान, संजय राऊत यांनी आपण राजकीय जीवनापासून काही दिवस दूर राहणार असल्याचे सांगितले होते. तसेच प्रकृती ठीक नसल्याचे देखील त्यांनी सांगितले होते. त्यानंतर त्यांना अनेकांनी लवकर बरे होण्याच्या शुभेच्छा दिल्या होत्या. त्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील 'लवकर बरे व्हा', अशा सदिच्छा दिल्या होत्या. आदित्य ठाकरे यांनी देखील एक पोस्ट करत म्हटले होते की, काळजी घे संजय काका! प्रत्येक संकटाच्या डोळ्यात डोळे घालून तू लढतोस आणि जिंकतोस. आत्ताही तेच होईल, याची खात्री आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले होते.

## केसर जवळगाच्या कन्यांनी राज्यस्तरीय रंगमंचावर उमटवला शौर्याचा ठसा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** सातारा जिल्ह्यातील वाई-वाठार येथे दिनांक ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या द्वितीय राज्यस्तरीय दांडपट्टा अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याचा अभिमान वाढवणारा गौरवशाली क्षण घडला.पीएमश्री जिल्हा परिषदेची केंद्रीय प्राथमिक शाळा केसर जवळगा येथील दोन प्रतिभावान विद्यार्थिनींनी —कु. दीपिका ख्यामलिंग घोडके व कु. रूपाली शाहुराज गायकवाड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदक मिळवत शाळेचा तसेच तालुक्याचा गौरव वाढवला. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष अजीज शेख, माजी सरपंच अमोल पटवारी, माजी अध्यक्ष दत्ता घोडके, तसेच लोकेश पाटील, शुभम कांबळे, शिरीष पाटील आदी मान्यवरांनी विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन केले. याच कार्यक्रमात श्री. हणमंत पाटील (माजी सैनिक तथा नवनियुक्त पोलीस कर्मचारी) यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख मु.अ. बालाजी भोसले, सुनिल राठोड, संजीव भोसले, साधना ताशी, गजानन खमीतकर, अनंत वाघमोडे, सुंकेवर सर, कुन्हाळे सर, तसेच युवा प्रशिक्षणार्थी वैभव पाटील यांनी मोलाचे परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालाजी भोसले यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन सुनिल राठोड सर यांनी व्यक्त केले. या स्पर्धेतून विद्यार्थिनींनी दाखवलेला शौर्य, शिस्त आणि चिकाटीचा प्रत्यय पाहून संपूर्ण गावकऱ्यांचा अभिमान वाढला आहे.

## जिल्हास्तरीय भव्य इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई, तसेच राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रवीनगर, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय समर्थ नगर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने इन्स्पायर अवॉर्ड जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.हे प्रदर्शन शैक्षणिक वर्ष २०२३—२४ आणि २०२४—२५ साठी डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३ व १४ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येत आहे.छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन्ही जिल्ह्यांतील विविध शाळांमधून निवड झालेल्या ११८ विज्ञान प्रकल्पांना या जिल्हास्तरीय प्रदर्शनात सहभागाची संधी मिळणार आहे. त्यापैकी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होईल.या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन मा. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी (भा.प्र.से.) यांच्या हस्ते गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ११ वाजता तापडिया नाट्यमंदिर, समर्थ नगर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. यावेळी अध्यक्ष माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर प्रमुख उपस्थिती सिमा मेहत्रे उपशिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांची उपस्थिती असणार आहे. छत्रपती संभाजीनगर व जालना दोन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमी नागरिक या दोन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घेणार आहेत.हे प्रदर्शन १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपासून १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी - शिक्षक तसेच सर्वांसाठी हे प्रदर्शन खुले राहील. असे परिपत्रक जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने काढण्यात आले आहे. माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी दिलेल्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना आपले विज्ञान प्रकल्प, आवश्यक साहित्य आणि मॉडेलसह ठरविलेल्या दिवशी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यासोबत एक मार्गदर्शक शिक्षक उपस्थित राहणार आहेत. या दोन दिवस चालणाऱ्या प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या नवकल्पना पाहण्यासाठी शिक्षण विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि विज्ञान प्रेमी उपस्थित राहणार आहेत. असे परिपत्रक शिक्षण विभागाने काढले आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या पुढाकारामुळे छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्हा यंदा विज्ञानवोन्मेषाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. इन्स्पायर मानक अवार्ड (प्रेरित संशोधनासाठी विज्ञानाच्या शोधात नवोपक्रम) ही केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाची योजना असून, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, प्रयोगशीलता आणि नवोन्मेषी दृष्टिकोन वाढविण्यासाठी राबवली जाते. या प्रदर्शनातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संधी मिळणार आहे असे शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर म्हणाल्या. इन्स्पायर मानक अवार्ड प्रदर्शन विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील नवनवीन प्रयोग करण्यास प्रोत्साहन देते. तसेच छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा आणि मेहनतीचा आम्हाला अभिमान आहे असे माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती आश्विनी लाठकर म्हणाल्या. तर या प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव मिळणार असून विज्ञान विषयावरील आवड अधिक वृद्धिंगत होईल असे प्राचार्य सुनीता बाजपाई यांनी सांगितले.त्यामुळे सर्वांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा लाभ घ्यावा, असे माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी आवाहन केले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईंडींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ नोव्हेंबर २०२५


## उत्तरेकडील शीत लहरींमुळे गारठा वाढला, विदर्भाला यलो अलर्ट



**मुंबई :** राज्यात हिवाळ्याची चाहूल आता प्रत्यक्ष जाणवू लागली आहे. मुंबईसह उपनगरांमध्ये रात्री आणि पहाटे गार वारे सुटायला लागले आहेत. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तापमान झपाट्याने घसरू लागले आहे. हवामान विभागाने येत्या सात दिवसांत तापमानात आणखी ४ ते ५ डिग्री सेल्सियसपर्यंत घट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील तापमानात घट होत आहे. पुणे जिल्ह्यात पहाटेचे तापमान १० डिग्री सेल्सियसपर्यंत खाली आले आहे. पुढील ४८ तासांत ही थंडी आणखी वाढण्याची शक्यता असून, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि उत्तर भारतात थंडीची तीव्र लाट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तर भारतातून दक्षिण भारताकडे वाहणाऱ्या शीत लहरींमुळे येत्या शुक्रवार पर्यंत किमान तापमानाचा पारा खाली राहण्याची शक्यता असल्याचे प्रादेशिक हवामान केंद्राने सांगितले. हिमालयात चार दिवसांपूर्वी झालेल्या बर्फवृष्टीमुळे उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई सोबत लगतच्या परिसरात तापमान कमी झाले आहे. दुसरीकडे मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगड, दिल्ली ,उत्तर प्रदेश या भागात थंडीची लाट राहणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे .

१२ आणि १३ नोव्हेंबर रोजी विदर्भासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान तज्ज्ञ उमाशंकर दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कालावधीत रात्रीचे तापमान मोठ्या प्रमाणात घटेल. १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी वातावरण थंड राहणार असले तरी कोणताही नवीन इशारा देण्यात आलेला नाही. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागांमध्येही थंडीचा जोर वाढत असून, पहाटेच्या वेळी गारठा जाणवतो आहे. दुपारच्या वेळी थोडे उष्ण वातावरण, तर रात्री कडाक्याची थंडी अशी दिवस-रात्र तापमानातील मोठी तफावत सध्या अनुभवायला मिळत आहे.

हवामान तज्ज्ञ उमशंकर दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये पुढील तीन दिवस हवामानात मोठे बदल होणार नाहीत, मात्र थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या सीमावर्ती राज्यांमध्ये थंडीची तीव्रता जास्त राहणार असून, तिथे ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी करण्यात आले आहेत. ला निनाच्या प्रभावामुळे यंदा थंडी जास्त वाढण्याची शक्यता असल्याचेही हवामान विभागाने यापूर्वीच सांगितले होते. त्यामुळे नागरिकांनी स्वेटर काढावेत आणि थंडीपासून बचाव करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान तज्ज्ञ उमशंकर दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार सायक्लोनिक सर्क्युलेशनचा धोका भारताला आहे. एक उत्तरेकडे आहे. तर दुसरे दक्षिणेकडील राज्यांवर सायक्लोनिक सर्क्युलेशन स्थिती तयार झाली आहे. उर्वरित दोन पश्चिम बंगालच्या उपसागरात आहेत. त्यामुळे समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवामानात बदल होत आहेत. उत्तरेकडील राज्यांमध्ये किमान तापमानात कोणतीही घट होणार नाही. पुढचे पाच दिवस तापमान थंड राहणार आहे.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903


## सत्यशोधक महिला विकास मंडळाच्या तिसगाव विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला




**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील सत्यशोधक विकास महिला मंडळ संचलित तिसगाव विद्यालय तिसगाव येथे दिनांक ८ नोव्हेंबर रोजी वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी दिवाळी भेट २०२५-२६ अध्याय २ देखील संपन्न झाला.सदरील कार्यक्रमासाठी सत्यशोधक महिला विकास छ.संभाजीनगर या सेवाभावी संस्थेचे सन्माननीय सचिव तथा तिसगाव विद्यालय शालेय समिती चे अध्यक्ष प्रा. डॉ.श्री.विश्वजित गायके हे अध्यक्ष म्हणून लाभले.तसेच फीनोलेक्स केबल्स कंपनीचे विक्री व्यवस्थापक श्री. कुणाल महाजन तसेच श्री.घायतीलक यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला.यावेळी दिवाळी भेट अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य वितरित करण्यात आले. तद्नंतर वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री पवार सहाय्यक शिक्षक कर्मचारी श्री हिवर्डे मोटे तिडके अधाने गायके अवाले श्री राठोड श्री वानखेडे व सर्व शाळेचे कर्मचारी विद्यार्थी ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते,कार्यक्रम संपन्न झाल्यावर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत इमोशनल इंटेलिजन्स क्लबचे उद्‌घाटन



**उमरगा : (प्रतिनिधी)** शहरातील श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने चालवल्या जाणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'इमोशनल इंटेलिजन्स' या क्लबचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य आणि करिअर कट्टा धाराशिव जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये करिअर कट्टा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सकारात्मक विकासासाठी आणि बौद्धिक वैचारिक भावनिक कौशल्य वाढीसाठी महाविद्यालयात इमोशनल इंटेलिजन्स क्लब स्थापन केल जात आहे. या क्लब मधील विद्यार्थी सदस्यांसाठी दर रविवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत ऑनलाईन पद्धतीने हा उपक्रम 52 आठवडे राबवला जाणार असून ,या करिता मुंबई येथील श्रीमती मिताली दळवी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.महाविद्यालयातील क्लबच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनात वावरत असताना मानसिक व बौद्धिक संतुलन राखून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घ्यावा असे आवाहन केले.मानवाला आपल्या भावना योग्य वेळी व्यक्त करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे जमले तर तो आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनामध्ये आपली भूमिका समाजामध्ये ठामपणे मांडू शकतो. करिअर कट्टा अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या तीनही क्लब विषयीची- फायनान्स क्लब आणि बिझनेस क्लब -माहिती विद्यार्थ्यांना देऊन ते कसे फायदेशीर होऊ शकतात आणि त्याचा विद्यार्थ्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्यात कसा फायदा करून घ्यावा याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. एस.पी. पसरकल्ले ,प्रा. डॉ. सी.डी.करे व इमोशनल इंटेलिजन्स क्लबचे पदाधिकारी प्रज्वल चव्हाण (अध्यक्ष), कु.निकिता टेकाळे (सदस्य), सैफ इनामदार (सदस्य), कु.दिशा सुरवसे (सदस्य),कु. प्रतिभा यादव (सदस्य), कु.योगेश्वरी मरकड (सदस्य), कृष्णा मारकड (सदस्य), कु.शुभांगी सीतापुरे (सदस्य), कु.वैष्णवी काळे (सदस्य) व इतर करिअर कट्टा मधील विद्यार्थी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री प्रज्वल चव्हाण तर आभार कु.अनिषा सुरवसे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ नोव्हेंबर २०२५


# पार्थ पवार प्रकरणात अंजली दमानिया सक्रिय; अजित पवारांवर नवीन संकट



**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पार्थ पवार भूखंड घोटाळ्याप्रकरणी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. तुम्हाला सिंचन घोटाळ्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडवले. पण यावेळी तुम्हाला फडणवीसच नव्हे तर अमित शहा किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदीही सोडवू शकत नाहीत. मी तुम्हाला एकाही केसमधून बाहेर येऊ देणार नाही याची खात्री बाळगा, असे त्यांनी अजित पवारांना उद्देशून म्हटले आहे. यावेळी त्यांनी उद्या सकाळी १० वा. मोठा गौप्यस्फोट करण्याचीही घोषणा केली.

अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या पुण्यातील कथित भूखंड घोटाळ्यामुळे राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. अजित पवार यांनी हा व्यवहार रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक समितीही नियुक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारांनीही या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे. यामुळे सरकारवरील दबाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी आज राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या प्रकरणाची माहिती घेतली.

त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या, मी हायकोर्टाकडे अपिल करून सिंचन घोटाळा, महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह घोटाळा, जरंगेश्वर घोटाळ्याच्या सर्व फाईल्स हळूहळू बाहेर काढणार आहे. सिंचन घोटाळ्यातून तुम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडवले आहे. पण यापुढील कोणत्याही घोटाळ्यातून तुम्हाला फडणवीसच नव्हे तर अमित शहा किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदीही तुम्हाला सोडवू शकत नाही. मी कोर्टाकडून ऑर्डर घेऊन तुम्हाला एकाही केसमधून बाहेर येऊ देणार नाही याची तुम्ही खात्री बाळगा. अंजली दमानिया यांनी यावेळी अजित पवारांचे नाव घेतले नाही. पण त्यांचा बोलण्याचा रोख त्यांच्याकडेच होता.

आत्ताच्या घटकेला सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सरकारने जे ४२ कोटी रुपये देऊन तो व्यवहार रद्द करण्याची नोटीस काढली आहे, ही नोटीसच मुळात चुकीची आहे. हा अधिकार महसूल विभागाकडे नाही. यासंबंधीचा कोणताही आदेश सिव्हिल कोर्टच देऊ शकते. त्यामुळे आत्ता जे सांगितले जात आहे की, चोरीचा माल आम्ही परत दिला आणि चोरी झालीच नाही. हा व्यवहार रद्द झाला आणि हा विषय संपला, असे बिल्कुल नाही. या सर्व गोष्टींचा एक प्रचंड मोठा खुलासा मी उद्या सकाळी १० वा. करणार आहे, असेही अंजली दमानिया यांनी यावेळी सांगितले.

सरकारने या घोटाळ्याप्रकरणी एक समिती स्थापन केली आहे. पण अंजली दमानिया यांनी त्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एवढेच नाही तर या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यावरही सवाल उपस्थित केला आहे. या प्रकरणी FIR झाला, पण त्यातही scam? पार्थ अजित पवारचे नाव नाही आणि कंपनीचे पण नाव नाही? का? ह्यातून सुद्धा वाचवण्याची तयारी? बास करा राजकारण. चौकशी करा आणि शिक्षा द्या. ह्या वेळी जी समिती स्थापन होईल, त्यात फक्त शासकीय अधिकारी नाही, जनतेतून सुद्धा प्रतिनिधी हवेत. मी हे प्रतिनिधित्व करायला तयार आहे, असे त्या म्हणाल्या.

दिग्विजय अमरसिंह पाटील यांच्या 'अमेडिया एंटरप्राइजेस एलएलपी' या कंपनीने मुंढव्यातील ही जमीन मे महिन्यात खरेदी केली आहे. त्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार हे भागीदार आहेत. या व्यवहाराचा दस्त नोंदविताना अनियमितता झाली असल्याचे यापूर्वीच नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या निदर्शनास आले होते. त्यावरून विभागाकडून ३० ऑक्टोबर रोजी कंपनीला नोटीस बजाविण्यात आली, अशी माहिती नोंदणी विभागातर्फे देण्यात आली. सरकारच्या मालकीची जागा असल्यामुळे रेडीरेकनरमधील जमिनीच्या दराच्या पन्नास टक्के म्हणजे १४६ कोटी रुपयांचा नजराणा भरणे बंधनकारक आहे. तो देखील संबंधित कंपनीने भरलेला नसल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# भाजपला धक्का! महेश पाटील आणि विजय कुंभार राष्ट्रवादीत



**सांगली :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आपली मोर्चेबांधणी सुरू केली आहे. सांगलीत महायुती विशेषतः भाजपला शह देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी मोठा डाव टाकला आहे. भाजपचे एकनिष्ठ समजले जाणारेच आपल्याकडे खेचल्याचे दिसत आहे.

ईश्वरपूर शहराच्या राजकारणात भाजपचे एकनिष्ठ म्हणून परिचित असलेले दिवंगत माजी नगराध्यक्ष अशोकराव पाटील यांचे सुपुत्र व भाजपचे माजी नगरसेवक विक्रम पाटील यांचे बंधू महेश पाटील व माजी नगरसेवक विजय कुंभार यांनी जयंत पाटलांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशामुळे ईश्वरपूर येथील राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच लवकरच आणखी काही दिग्गज राष्ट्रवादीत येतील असे सूचक विधानही जयंत पाटील यांनी केले आहे.

या पक्ष प्रवेशावेळी जयंत पाटील म्हणाले, महेश पाटील हे जिद्दी कार्यकर्ते तर विजय कुंभार अभ्यासू नगरसेवक आहेत. त्यांच्या प्रवेशाने शहराच्या विकासाला गती येईल. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदराव मलगुंडे यांना दुप्पट बळ मिळेल. शहराच्या भविष्याविषयी काळजी असलेले हे लोक राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करत आहेत, ही आनंदाची बाब आहे. ईश्वरपूर शहराचा विकास करण्यासाठी आपल्याला अनेक स्वप्न होती. त्या स्वप्नांची पूर्तता करायला हे शहर अधिक गतिमान झाले पाहिजे. या शहरातल्या रखडलेल्या कामांना अधिक वेगाने पुढे नेले पाहिजे. शहरातल्या नागरिकांना महाराष्ट्रातल्या इतर शहरांसारख्या सुविधा सहजगत्या उपलब्ध व्हाव्यात हा माझा प्रयत्न राहणार आहे. आमच्यावर विश्वास ठेवून अजूनही काही लोक प्रवेश करणार असल्याची माहिती जयंत पाटील यांनी दिली आहे.

पक्ष प्रवेश केल्यानंतर महेश पाटील म्हणाले, आमचे घर भाजपचे एकनिष्ठ घर म्हणून ५० वर्षे शहरात परिचित आहे. आजही माझ्या घरावर भाजपचा झेंडा आहे. भाजप सोडताना प्रचंड वेदना होत आहेत. मात्र शहरात नगराध्यक्ष कोण असावा व पालिकेत नगरसेवक कोण असावेत हे तीन गुंडांच्या टोळ्या एकत्र येऊन ठरवू लागल्या आहेत. ते आम्ही चालू देणार नाही. वडील अशोकराव पाटील यांचा विचार जयंत पाटील यांच्या माध्यमातून पुढे घेऊन जाऊ. शहरातील नागरिकांवर अन्याय होता कामा नये ही कळकळ आहे. प्रभाग क्रमांक एकच्या उमेदवारीबाबतच्या बैठकीत मोक्यातील आरोपीचे नाव पुढे आले. नगरसेवकपद हे अंतीम ध्येय नाही. पण गुंड नगरसेवक होत असेल तर आम्हाला त्याची गरज नाही. त्या बैठकीला माझे सख्खे बंधू व चुलत बंधू उपस्थित असूनही काही बोलले नाहीत. गुन्हेगार पालिकेत शिरकाव करीत आहेत. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी जयंत पाटील यांनी आम्हाला ताकद द्यावी, असे पाटील म्हणाले.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002